




दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com
•मुख्य संपादक : अजय भांगे •संपादक : रमेश गुळभिले •कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७



बीड/महाराष्ट्र • गुरुवार ७ मार्च २०२४ • आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ • वर्ष १ ले • अंक २०४ • पाने ४ • किंमत ४ रुपये


## प्रकाश आंबेडकर नाराज की खूश होणार? महाविकास आघाडीचा प्रस्ताव काय?

**महाविकास आघाडीतल्या घडामोर्डीकडे सध्या राज्याचं बारीक लक्ष आहे. एकीकडे महायुतीच्या जागावाटपासाठी जोरदार हालचाली सुरु आहेत**



**दैनिक वादळ वार्ता**

: महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडीला 3 जागांचा प्रस्ताव दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वंचितला काँग्रेस एक, ठाकरे गट एक जागा देणार आहे. मविआची दोन जागांशिवाय आणखी एक जागा देण्याची तयारी आहे. तसेच वंचित बहुजन आघाडीसोबत न आल्यास महाविकास आघाडीचा 23, 15 आणि 10 फॉर्म्युला ठरला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर काय निर्णय घेतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. महाविकास आघाडीसाठी वंचितने सोबत येणं महत्त्वाचं आहे. पण प्रकाश आंबेडकर यांचा प्रस्ताव किंवा मविआचा प्रस्ताव आंबेडकरांना मान्य न झाल्यास ते सर्वच जागांवर निवडणूक लढवू शकतात. त्याचा फटका मविआलादेखील बसू शकतो. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेकडे सध्या राज्याचं लक्ष लागलं आहे. महाविकास आघाडीचं आगामी लोकसभा निवडणुकीसाठीचं जागावाटप अंतिम टप्प्यात आहे. वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीकडून महाराष्ट्रातल्या 48 लोकसभा मतदारसंघांपैकी 3 लोकसभा मतदारसंघ सोडण्याचा प्रस्ताव आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज महाविकास आघाडीची मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर प्रकाश आंबेडकर उपस्थित होते. जवळपास 4 तास बैठक चालली. त्या बैठकीत स्वत: प्रकाश आंबेडकर होते. मविआच्या आजच्या बैठकीत काय घडलं?

महाविकास आघाडीच्या आजच्या बैठकीत अवांतर चर्चा झाली. विविध विचारांची देवाणघेवाण झाली. महाविकास आघाडीकडून तीन जागांचा प्रस्ताल प्रकाश आंबेडकर यांना देण्यात आला आहे. ते तीन मतदारसंघ कोणते हे वंचितने ठरवायचं आहे. दुसरीकडे मविआच्या या प्रस्तावावर कुणाकडूनही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. प्रकाश आंबेडकर आज बैठकीतून बाहेर पडले तेव्हा त्यांनी फार प्रतिक्रिया दिली नाही. अजून चर्चा व्हायची आहे, असं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं. त्यांनी ठोस प्रतिक्रिया देणं टाळलं.

महाविकास आघाडीकडून वंचितला सोबत घेण्याची भूमिका आहे. ठाकरे गट आणि काँग्रेस प्रत्येकी एक जागा वंचितसाठी सोडण्याच्या तयारीत आहे. पण तरीही वंचित सोबत नाही आली तर मविआचा ठरलेल्या फॉर्मुला निश्चित केला जाणार आहे. यानुसार ठाकरे गट 23, काँग्रेस 15, राष्ट्रवादी शरद पवार गट 10 असं समीकरण असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे सांगलीची जागा ठाकरे गट लढणार असल्याचं निश्चित झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यासाठी ठाकरे गट महाराष्ट्र डबल केसरी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. चंद्रहार पाटील यांचा दोन दिवसांत पक्षप्रवेश केला जाण्याची शक्यता आहे.

## 14 मार्च रोजी राहुल गांधी मोखाड्यात

**मोरचोंडी येथे होणार मुक्काम, मोखाडा जव्हार विक्रमगड वाडा मार्गे यात्रा**

**दैनिक वादळ वार्ता पालघर/सौरभ कामडी**
काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी देशभर भारत जोडो यात्रा काढल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यातील भारत न्याय यात्रा सुरू आहे ही यात्रा आता महाराष्ट्रात दाखल होत असून नाशिक हून त्र्यंबकेश्वर येथे दर्शन करून ही यात्रा १४मार्च रोजी मोखाडा हद्दीत प्रवेश केल्यानंतर मोरचोंडी गावानजीक आमदार सुनिल भुसारा यांच्या निवासस्थाना जवळील मोकळ्या जागेत हा मुक्काम असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे तर १५मार्च रोजी सकाळी मोखाडा चौफुली जव्हार शहर विक्रमगड बाजारपेठ यानंतर वाडा येथून भिवंडी येथे मुक्कामाला जाणार असल्याचे नियोजन असून मोखाडा तालुक्यातील या यात्रेच्या यशस्वीतेसाठी आमदार सुनिल भुसारा आणि काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली असून तब्बल २५हजारांहून अधिक लोक या यात्रेत सहभागी होणार असल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रीय काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार राहुल गांधी यांनी देशातील मोदी सरकारच्या फसव्या योजना व शेतकऱ्यांच्या अन्यायकारक योजना विरोधात सर्व सामान्य नागरिकांना जागृत करुन एकत्र जोडण्यासाठी भारत जोडो न्याय यात्रा काढली आहे देशाच्या कानाकोपऱ्यातील सर्व सामान्य नागरिक भाजप सरकारच्या विरोधात एकत्र यावा यासाठी गेल्या काही महिन्यांपासून खासदार राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा सुरू केली आहे.याच भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून १४ तारखेला खा.राहुल गांधी मोखाडा येथे मुक्कामी येणार असून आदिवासी बांधवाशी संवाद साधणार आहेत.तसेच चौक सभा व रॅली काढून भाजपा सरकारच्या फसव्या योजना विषयी जागृती करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



एकूणच या न्याय यात्रेत मोठया प्रमाणावर नागरीक सहभागी व्हावे यासाठी गावोगावी बैठका घेण्याबाबत ठरले असून भित्ती पत्रके जनजागृती करण्यासाठी ध्वनीक्षेपक वाहने यावेळी पाडोपाडी फिरणार आहेत. याचवेळी सर्व सहभागी वाहने थेट भिवंडी पर्यंत सोबत जाणार असल्याचे चित्र आहे यामुळे विक्रमगड विधानसभा आणि जिल्हात एक चैतन्यमय वातावरण तयार करण्यात महाविकास आघाडी ने कंबर कसल्याचे दिसून येत आहे यावेळी काँगेस तालुकाध्यक्ष जमशीद(लारा) शेख, जिल्हा अध्यक्ष काँग्रेस आदिवासी सेल अशोक पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद कोठेकर , शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका अध्यक्ष दिलीप मोहंडकर , नगरसेवक वामन हमरे, शिवसेना शहर निखिल लोखडे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## बीड तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना आठ दिवसांत पाणी न दिल्यास तीव्र आंदोलन- जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**वादळवार्ता/बीड**
आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी बीड पंचायत समितीत जाऊन आपल्या पदाधिकाऱ्यांसोबत बी.डी.ओ.उदय सोळंके यांची भेट घेऊन बीड तालुक्यातील अनेक गावात पाणी टंचाई असुन महिला बंधू भगिनी खूप त्रस्त झालेल्या आहेत, दोन दोन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे, लहान लहान चिमुकल्यांना शाळा बुडवून पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे तसेच शेतकऱ्यांना विहिरीसाठी व गायगोटयासाठी वेठीस धरले जात असुन संबंधित कर्मचारी लुटमार करीत आहेत असे निदर्शनास आणून दिले येत्या आठ दिवसात बीड तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे व विहीर,गायगोटे , फळबाग , यासाठी होणारी लुटमार थांबवावी नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी दिला आहे यावेळी समवेत शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप, उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , विधानसभाप्रमुख सुशिल भैय्या पिंगळे , महादेव मामा परसकर युवा नेते रविअणणा वाघमारे ,नवीन भाई, विनोद गुंड पाटील , बाळासाहेब वरेकर ,बाबु कुटे ,अजय गायकवाड , यांच्यासह शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.



## एम.आय.टी. रोटेगावच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

**दैनिक वादळवार्ता**
**वैजापूर/चैताली औटे**
इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडंड्स स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत एम.आय. टी.पॉलिटेक्निक रोटेगावच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात भरीव कामगिरी करून यश संपादन केले. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांमध्ये कु.पल्लवी कठाळे आणि कु.प्रियांका कठाळे यांनी अनुक्रमे १०० आणि २०० मीटर रनिंगमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. ४x१०० मीटर रिले क्रीडा प्रकारात कु.पल्लवी व कु.प्रियांका कठाळे भगिनींनी कु.पूजा ठोंबरे आणि कु.नम्रता मोईनसह सांघिक विजय मिळवण्यासाठी प्रयत्न केले. भालाफेकमध्ये अमर पेनूरकर याने तर लांब उडी स्पर्धेत आदित्य जाधवने आपआपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत तिसरे स्थान पटकावले. क्रीडा प्रभारी प्रा.ए.ए. आव्हाळे, संघप्रभारी प्रा.ए.बी. गुंजाळ आणि प्रा.कु.व्ही.एस. सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत कौशल्यपूर्ण आणि खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन करत बक्षिसे प्राप्त केली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.वाय.ए. कवडे सर, महासंचालक प्रा.मुनिषजी शर्मा सर तसेच संस्थेचे प्राचार्य प्रा.के.एस. पाटील, अधिकारी वर्ग प्रा. डी.पी. आव्हाळे, प्रा. एन.आर. सोनवणे, सर्व विभाग प्रमूख प्रा.जी.ए. भिसे, प्रा. एस.एन. पाठक, प्रा.व्ही.एम. जाधव, प्रा.एस. राम, प्रा.एस.एस. सहाणे तसेच सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी यांनी सर्व गुणवंत खेळाडूंचे अभिनंदन केले



## महिला दिनानिमित्त आयोजित शांतीदूत रक्तदान शिबिरला तृतीयपंथी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक वादळ वार्ता**

जागतिक महिला दिनानिमित्त शांतीदूत परिवारातर्फे 'सेवा गौरव पुरस्कार प्रदान सोहळा २०२४' तसेच महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार दिनांक ३ मार्च रोजी युनिटी हॉस्पिटल, औंध येथे आयोजित करण्यात आले होते. १२७ महिलांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. अक्षय ब्लड बँकच्या सहाय्याने रक्तदात्यांनी तसेच तृतीयपंथांनी रक्तदान करून मानवतेचा सुंदर संदेश देऊन या पवित्र कार्यास सहभाग दर्शविला. त्याच प्रमाणे विविध क्षेत्रातील महिलांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सेवा रत्न गौरव पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. सन्मान चिन्ह, मानपत्र व मानवस्त्र असे या सन्मानाचे स्वरूप होते. शांतीदूत परिवाराचे मार्गदर्शक मा.डॉ. विठ्ठल जाधव IPS विशेष पोलिस महानिरीक्षक (से. नि.) व संस्थापिका मा.सौ. विद्याताई विठ्ठल जाधव यांच्यासह कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. भवानी राकेश U.K.(मिसेस युनायटेड and Professor at KBIPER (Krishna rao Institute of Pharmaceutical Education and Research), प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध अभिनेत्री मा. प्रिया बेर्डे, उद्योजिका व शांतिदूत परिवाराच्या उपाध्यक्ष मा.सौ.सुप्रिया बडवे, मा.सौ. सुनीता राजे पवार (प्रभावी वक्ते व संस्कृती प्रकाशन पुणे), युनीटी हॉस्पिटलच्या व शांतिदूत परिवार ट्रस्टी मा.अह्वी.ओंकार दादा जाधव,मा.डॉ. आशा काळे (माऊली), मा.डॉ. प्रिती काळे, मा.डॉ. अमित काळे, शांतिदूत परिवाराचे सर्व पदाधिकारी ? राष्ट्रीय अध्यक्षा सौ.तृषाली जाधव, विदर्भ अध्यक्ष व उद्योजक मा.श्री.हर्षल गौंड पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष शेतकरी शांतीदूत मा.श्री विजय ठुबे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा.श्री.प्रल्हाद साळुंखे, वरिष्ठ सल्लागार मा.डॉ. प्रिती काळे, आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष मा.डॉ. मधुसूदन घाणेकर, महाराष्ट्र अध्यक्षा मा.सौ. मोनिका भोजकर, महाराष्ट्र उपाध्यक्ष व अभिनेत्री मा.सौ. रोहिणी कोळेकर, महाराष्ट्र सचिव मा.श्री. सुरेश सकपाळ, अध्यक्ष पुणे शहर मा.सौ.राजश्री मालपुरे , शांतीदूत सरचिटणीस पुणे शहर मा.प्रिया दामले , पिंपरी चिंचवड अध्यक्ष मा.श्री. इंद्रजीत भोसले पिंपरी चिंचवड महिला अध्यक्ष मा.सौ.विजया नागटिळक, रयत शांतिदूत परिवार अध्यक्ष मा.श्री.तानाजी भोसले रयत शांतीदूत परिवार, उपाध्यक्ष मा.श्री. महेश पाटील, अध्यक्ष मॉडेल कॉलनी मा.श्री.मधुकर चौधरी, शांतीदूत नरेंद्र सिंघवी, डॉ. भगवानराव माकणीकर., सौ. प्राजक्ता माकणीकर, सौ.अश्विनी थोरात, प्रा.रविराज थोरात, प्रा.विलास कदम लातूर योगगुरु श्री अनंतराव जी झांबरे इत्यादी



# संपादकीय

## “स्त्रीला अजूनही सन्मान मिळाला नाही”

जागतिक महिला दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा. 8 मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो.या दिवशी आपल्या महिलांच्या योगदानाची. तपश्चर्याची आणि त्यागाची आठवण करून देण्याचे आणि महिलांना पुढे जाण्यासाठी प्रेरणा देते.

“ती आहे म्हणून विश्व आहे असे समजले जाते”

छत्रपती शिवरायांच्या रूपाने स्वराज्याला जन्म देणाऱ्या मासाहेब जिजाऊ ,रणरागिनी होऊन संघर्षाचा बळ देणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई, स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि मातृत्व ,नेतृत्व तसेच कर्तुत्व सिद्ध करून रायगडाचा निमुळता कडा उतरून आपल्या बाळाला दुध पाजण्यासाठी धाडस करणारी हिरकणी ,भारताच्या पहिल्या महिला डॉं.आनंदीबाई जोशी,अनाथाची माय शिंधुताई सपकाळ, आकाशात झेप घेणाऱ्या कल्पना चावला,बाबासाहेबाची सावली असणारी त्यागमूर्ती रमाबाई तसेच मानवतेची ज्योत तेवत ठेवणार्या सर्व महिलांना माझा मानाचा मुजरा.

महिलांनी भीती न बाळगता मुक्तपणे जगावे. तिच्या स्वप्नांची इच्छा आकांक्षाना नव बळ मिळावे म्हणूनच खरंतर महिला दिन साजरा केला जातो. महिला दिन आला की तिच्या कर्तुत्वाचा तिच्या महानतेचा गोडवा गायला जातो. तिचा सत्कार केला जातो .पण हा सोहळा फक्त एका दिवसात पुर्ताच मर्यादित आहे. फक्त एक दिवस तिचा सत्कार केला जातो आणि इतर दिवशी फक्त तिचा अपमानच होतो.स्त्रीच्या वाट्याला आलेले अर्धे आभाळ अजूनही काळवंडलेले आहे.हे मळभ हटविण्यासाठी तिचा निकराचा लढा सुरूचआहे.अनेक क्षेत्रात स्त्री तळपती समशेर(तलवार) बनून ती आपल्या शत्रूशी लढत आहे.हे शत्रू किती आहेत हे ओळखणे अवघड आहे.स्त्रीची, जगातील सर्वात सुरक्षित जागेत म्हणजे आईच्या पोटात तिच्या गळ्याला नख लावण्याचे दृष्टकार्य केले जाते.तेही जन्मदात्या आईबापाच्या संमतीने आणि आजी,आजोबा, आत्या,मामा यांच्या साक्षीने, कदाचित आईच्या मनाविरूद्ध ते घडत असेल. आपल्या गर्भाच्या मृत्यूबरोबर मातृप्रेमाच्या,वात्सल्याच्याही चिंधड्या उडविल्या जाताना त्या स्त्रीला बघावे लागते.स्त्रीने जगात प्रवेश केल्यावरही भय इथेच संपत नाही.घरातील नातेवाईकापासून तर गावातील गुंडापर्यंत स्त्रीच्या “वाटेवरच्या काचा “बनून तिची पावले रक्तबंबाळ करू शकतो.

प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात आणि यशात स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे. हे विधान काही चुकीचे नाही. शिवरायांच्या हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यामागे प्रेरणा असणाऱ्या माँसाहेब जिजाऊ आहेत. स्वातंत्र्याची चेतना देणाऱ्या रणरागिनी झाशीची राणी लक्ष्मीबाई आज इतिहासात अजरामर आहेत.स्त्री शिक्षणासाठी झटणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीमाई मुळे स्त्री शिक्षित झाली आहे.स्त्रीने प्रत्येक क्षेत्रात उंच झेप घेतलेली आहे.

आज पुरुषाबरोबर स्त्रियादेखील सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत आहे.परंतु आज देखील स्त्री सुरक्षित नाही हे खेदाने बोलावे लागते.लैंगिक शोषण,अत्याचार, हुंडाबळी, भृणहत्या या गोष्टींमुळे स्त्रियांच्या ,मुलीच्या मनात भितीची,असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मुलीचा जन्म झाल्यावर तिचा तिरस्कार केला जातो. तिचा अपमान केला जातो. कारण आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. स्त्रीला प्रत्येक वेळी अपमानच भोगावा लागतो. स्त्रीच्या आयुष्यातील स्वप्न सोहळा म्हणजे तिचे लग्न होय.ती आपल्या संसाराची स्वप्न रंगवित असते. पण नवऱ्याच्या आई, बहिणीच्या रोषाला बळी पळते.त्यांची विचारशक्ती स्टोव्हच्या इंधनापेक्षाही जास्त ज्वालाग्रही असते. पती पत्नीच्या संसारात हा ज्वालाग्रही स्फोट करून त्या स्त्रीच्या स्वप्नाची राख करतात.मुलगी लग्न होऊन सासरी गेल्यानंतर तिचा छळ केला जातो. तेव्हा ती सुरक्षित असते का? ती आपल्या हक्काचे माहेर सोडून सासरी जाते.तेव्हा त्या मुलीला सासरचे रीतिरिवाज माहीत नसते. त्यासाठी तिला पहिले समजावून सांगितले पाहिजे.तिच्या अंगी असणाऱ्या गुणांना वाव दिले पाहिजे. असे तर होत नाही. उलट तिच्यावर दबाव टाकला जातो.तिला फक्त चूल आणि मूल ह्या व्यतिरिक्त कुठल्याच गोष्टीचा स्वातंत्र्य दिला जात नाही.तिच्या भावनांचा तिच्यातील असणाऱ्या गुणांचा कधीच विचार केला जात नाही. कारण तिला कधीच समजून घेतलेले नाही. तिच्यातल्या सुप्त गुणांचा ते कधीच विचार करीत नाही.नवीन घरात येणा-या त्या मुली विषयी उलट विचार करतात. तुला काय समजते असे म्हणून तिच्या मनातील भावना दाबल्या जातात. सासू नावाची स्त्री, सून नावाच्या स्त्रीचा इतका प्राणांतिक दुस्वास का कारते? हे मानव जातीला आतापर्यंत न उलगडलेले कोडे आहे.स्त्रीला निसर्गाने प्रेम नावाची विलक्षण देणगी दिली आहे.तेच स्त्रीचे शस्त्र आहे. या शस्त्राद्वारे स्त्रीने अनेक अवघड कसोट्या सहजरित्या पार पाडल्या आहेत. स्त्रीच्या शब्दात मंत्राचे सामर्थ्य आहे .या शब्दांनी ती अग्नी फुलवूही शकते.आणि विझवूही शकते. स्त्रीच्या डोळ्यातल्या अंगाराला कायद्याचे कवच लाभले तर दुष्कर्म करणारे निश्चितच पुढे येण्यास घाबरतील. म्हणूनच म्हणते की, स्त्रीला अजूनही पाहिजे तो मानाचे स्थान प्राप्त नाही.

जर स्त्रीने आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केलात, तर तिच्यावर आरोप लावून घराबाहेर काढले जाते किंवा घटस्फोट देण्याचा प्रयत्न केला जातो.कारण आपल्या देशात पुरुषप्रधान संस्कृती आहे. स्त्री आणि पुरुष समानता हे फक्त लिहिलेले आहे त्याची कधी अमल बजावणी होणार का? की स्त्रीला फक्त टांगत्या तलवारीचे स्थान मिळणार का ?

स्त्री जर स्वतंत्र असती तर, तिच्यावर कुठल्याच प्रकारचे अत्याचार झालेच नसते.आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या जंजिरात ती जखळलेली आहे. एखादी नोकरी करणारी स्त्री असेल तर तिचा अधिकारी तो पुरुष असेल तर तिला कोणत्या ना कोणत्या तरी कारणावरून तो छळणारच मग स्त्री ही कुठे सुरक्षित आहे ? घरातून बाहेर निघणा-या मुलीला घरी येईपर्यंत तिच्या घरच्या लोकांच्या नजरा तिच्या येण्याची वाट बघत असतात.की आमची मुलगी कधी घरी लवकर येणार, यायला उशीर झाला तर मनात नको ते प्रश्न निर्माण होतात. म्हणूनच म्हणते की स्त्री ही अजूनही सुरक्षित नाही. आजही महिलावर अत्याचार होतात. जर एखाद्या स्त्रीला मुलीच झाल्या तर, घरचे लोक त्या स्त्रीलाच जबाबदार ठरवितात. पण ते आपल्या मुलाला दोष देत नाही.किंवा स्त्रीला मुलं होत नसेल तर...! सुद्धा स्त्रीलाच दोष दिला जातो.....आणि त्या मुलाचे दुसरे लग्न करण्यास तयार होतात. ते कायदेशीर गुन्हा असून सुद्धा त्या स्त्रीवर अत्याचार,छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त करतात...किंवा तिच्याकडून खोटी परवानगी घेतली जाते...तर, एखाद्या स्त्रीला मुलीच झाल्या आणि दुसऱ्या स्त्रीला मुलगा झाला तर ती स्त्री आपल्या मुलाला पदरात लपवून नेते. म्हणजेच तिचा गैरसमज असते की, या स्त्रीची दृष्ट लागेल....पण हे सत्य नसते.हे समाजाने मना किंवा जवळच्या नातेवाईकानी कुठेतरी थांबविले पाहिजे. तरच कुठे स्त्री ही सुरक्षित राहील ...नाहीतरी हे फक्त सांगण्या पुरते आहे....जग किती पुढे गेला तरी ...तिच्यावर होणार अत्याचार, अन्याय कधीच कमी होणार नाही ....हे सर्व बंद होईल तेव्हाच ख-या अर्थाने स्त्री सुरक्षित होईल असे मला तरी वाटते..

# महिला दिनाच्या शुभेच्छा देताना

28 फरवरी 1908 एकाच वेळी पंधरा हजार महिला कामगारांनी स्त्री पुरुष वेतन समानतेसाठी तसेच स्वतःच्या हक्काकरिता अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरात पहिल्या वेळेस आंदोलन केले आणि त्याचाच परिणाम अमेरिकेतील सरकारला कामगार स्त्रियांच्या मागण्या स्वीकाराव्या लागल्या. आणि त्यानंतर 8मार्च 1910 पासून महिलांच्या सन्मानासाठी प्रत्येक वर्षी महिला दिवस साजरा केला जाईल असे घोषित करण्यात आले. अशा पद्धतीने सुरू झालेले हे महिला दिवस प्रत्येक वर्षी एका विशेष थीम सोबत संपूर्ण विश्वात साजरा करावा याची 1975 रोजी संयुक्त राष्ट्राने संमती दिल्यानंतर प्रत्येक वर्षी एका विशेष थीम सोबत 8 मार्च हा दिवस संपूर्ण विश्वात महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. 2024 महिला दिनाची थीम आहे inspire inclusion म्हणजेच सर्व क्षेत्रांमध्ये महिलांच्या समावेशास प्रेरणा देणे. जागतिक स्तरावर महिला दिनाच्या इतक्या सर्व तयारी होत असताना आजही आपल्याकडे अनेक खेड्या गावांमध्ये तसेच शहरांमध्ये देखील हजारो वर्षांपासून जी पुरुषप्रधान संस्कृती चालत आली आहे ती महिलांचे स्वतंत्र स्वीकारण्यास आजही सहज तयार होत नाही.. अनेक ठिकाणी आजही अशा घटना घडतात ज्यामुळे जे चित्र डोळ्यापुढे उभे राहते ते म्हणजे आजही आपल्या हक्कासाठी लढा देणाऱ्या अनेक स्त्रियांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे कित्येक घरात आजही स्त्रियांना दिली जाणारी वागणूक ही पूर्वीपेक्षा वेगळी नाही याचे एक न हजार उदाहरण रोज आपल्यासमोर आपण पहात असतो समाजातील शंभर-दोनशे स्त्रियांना सगळ्या बाबतीत स्वतंत्रता मिळाली आणि त्या शिक्षणाने आर्थिक दृष्टीने तसेच मानसिक दृष्टीने देखील सदृढ झाल्या याचा अर्थ संपूर्ण स्त्रिया देखील ही पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्या आहे असा गैरसमज समाजाने अजिबात करून घेऊ नये.अगदी त्याचप्रमाणे सुशिक्षित झालेल्या स्त्रियांनी देखील आपण आर्थिक दृष्ट्या तसेच शैक्षणिक दृष्टीने परिपूर्ण झालो आहोत आणि तरी देखील आपल्या आसपास राहणाऱ्या स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आपल्याच जवळच्या कोणाला आवडत नाही म्हणून एक शब्द बोलू शकत नसेल तर अशा स्त्रिया देखील सुशिक्षित असून शेवटी गुलामच आहेत. स्त्रियांचे सुशिक्षित होणे म्हणजे तिला तिच्या हक्काबद्दल कळणे आणि ज्या स्त्रीला स्वतःच्या हक्काची स्वतःच्या आत्मसन्मानाची जेव्हा खरी जाणीव होते तेव्हा ती आपल्यासमोर इतर स्त्रियांचा देखील अपमान सहन करू शकत नाही मग ती स्वतः दुसऱ्या स्त्रियांचा अपमान कसे काय करणार म्हणूनच सुशिक्षित स्त्रियांना स्वतःला तोपर्यंत सुशिक्षित म्हणण्याचा अधिकार नाही जोपर्यंत त्या स्वतः समोर त्रास होत असलेल्या स्त्रियांच्या अधिकारासाठी प्रयत्न करणार नाही.बदलत्या काळाबरोबर स्त्रियांवरील होणारे अत्याचार थांबले असून ‘आधुनिक स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आनंदाने जगत आहे’ ही गोष्टी फक्त भाषणासाठी आणि समाजातील दहा टक्के पेक्षाही कमी स्त्रियांसाठी सत्य असू शकते. एक अक्षराची ओळख नसताना जो अन्याय अत्याचार स्त्रियांनी सहन केला तोच अन्याय आजही अनेक ठिकाणी स्त्रियांवरती केला जात आहे. एकीकडे सासर आणि दुसरीकडे माहेर या दोन कुटुंबाच्या मर्यादेचा विचार करत करत आजही हजारो स्त्रिया चार भिंतीच्या आड कितीतरी त्रास सहन करत आहे. उच्चशिक्षित आणि स्वतःच्या जबाबदाऱ्या स्वतः पार पाडणाऱ्या स्त्रियांना देखील अनेक ठिकाणी कुटुंबाची जबाबदारी सर्वप्रथम म्हणून मागे ओढण्याचे अनेक प्रकार आपण रोज पाहत आहोत शांतपणे तिने जर हे मान्य केले तर सगळं व्यवस्थित आहे आणि जिथे कुठे तिने थोडासा नकार दिला तर तिचीही परिस्थिती इतर स्त्रियांपेक्षा वेगळी नाही. कितीही काही झाले तरी प्रत्येक वेळेस मर्यादित राहण्याची अपेक्षा स्त्रियांकडूनच केली जाते. जन्मापासूनच नदीसारखी मुक्त असलेली स्त्री खऱ्या अर्थाने प्रेमाची आणि वासल्येची मूर्ती असते. ज्याप्रमाणे डोंगरात जन्मलेली नदी आपले सर्वस्व अर्पण करून सागरात विलीन होते आणि स्वतःची ओळख विसरून जाते अगदी त्याचप्रमाणे माहेरात जिचा जन्म होतो आणि आयुष्यभर सर्वांची सेवा करत सासरच्या प्रत्येक माणसांमध्ये माहेरच्या प्रेमाची ऊब शोधत,आपल्या जोडीदाराचा विश्वास आयुष्यभर आपल्यावर राहावा या एकाच अपेक्षेत स्वतःची ओळख विसरते तरी तिला तिच्या हक्काचे प्रेम देखील जर सहजासहजी मिळत नसेल तर ज्या दिवशी ती आत्मविश्वासाने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा विरोध करेल ज्या दिवशी तिला तिच्या अधिकाराची खरी ओळख होईल ज्या दिवशी चुकीचे पाऊल न उचलता तिच्यावर अन्याय करणाऱ्या आणि बाहेरच्या लोकांसमोर चांगलेपणाचा मुखवटा मिरवणाऱ्या पुरुषाचा खरा चेहरा समाजापुढे आणण्याचे धाडस एका स्त्रीमध्ये निर्माण होईल. त्यादिवशी आपल्या भारतामध्ये खऱ्या अर्थाने आपण महिला दिवस साजरा केल्याचे सार्थक होईल प्रत्येक वर्षाप्रमाणे यावर्षी देखील महिला दिनाच्या शुभेच्छा प्रत्येकाने इतर स्त्रियांना देण्यापूर्वी आपल्या कुटुंबातील स्त्रियांच्या हक्काबद्दल आपण किती जागृत आहोत ह्या गोष्टीचा नक्कीच विचार कराल.

**पूनम सुलाने-सिंगल**
**गोकुळवाडी,ता.जाफराबाद**

# तंबाखू, गुटखा खाऊन स्वाराती रुग्णालयात थुंकलात तर होणार दंड; दंडाची पहिली पावती

वादळवार्ता/अंबाजोगाई

येथिल स्वाराती रुग्णालयाच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा खाऊन थुंकल्यामुळे दुर्गंधी पसरते. या दुर्गंधीमुळे रुग्णांसोबत रुग्णालयात काम करणाऱ्या डॉक्टर, परिचारिका, सुरक्षारक्षक व इतर कर्मचाऱ्यांनाही याचा मोठा त्रास होतो .त्यामुळे रुग्णालय प्रशासनाकडून तंबाखू, गुटखा सेवन करून रुग्णालयात आल्यास व रुग्णालयाच्या आत जाताना सोबत घेऊन गेल्यास शंभर रुपये दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दिवसभरात हजारो रुग्ण उपचारासाठी येत असतात. या व्यतिरिक्त कुपोषित बालके, सिकलसेल रूग्ण, प्रसूती माता, तसेच विविध आजारांसह गंभीर अपघाताच्या रुग्णांना उपचार होईपर्यंत रूग्णालयात थांबावे लागते. दाखल असलेल्या रुग्णांना भेटण्यासाठी नातेवाईक ही मोठ्या प्रमाणात रुग्णालयात येत असतात.



परंतु रुग्णालयात येणारे रुग्ण व नातेवाईक यापैकी काही जण तंबाखू, गुटखा खाऊन रुग्णालयाच्या आवारात तसेच खिडक्या-दरवाजे व खाटेखाली थुंकून घाण करत असल्याचे निदर्शनास आल्याने रुग्णालयाचे स्वच्छता निरिक्षक प्रताप चितामणी व प्रशासनाने दंडात्मक कारवाईला सुरुवात केली आहे. दि.५ मार्च मंगळवार रोजी अश्याच एका नातेवाईकाला परिसरामध्ये थुंकल्याच्या कारणाने शंभर रुपये दंड केला ही स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या इतिहासातील पहिला दंड आहे.

# महिला डॉक्टरच्या पुढाकाराने आयोजीत महाशिवरात्र सोहळ्यात आरोग्य तपासणी व उपचार शिबीरात १७५ गरजूंनी घेतला उपचार !

# शिबीरात जवळपास तीस आजाराचे निदान व मिळाला होमिओपॅथी उपचार !

वादळवार्ता/शिरूरकासार

शिरुर कासार येथील धाकटी अलंकापुरी म्हणून सर्वदूर प्रसिध्दिस असलेल्या सिध्देश्वर संस्थानवर महाशिवरात्र सोहळ्यात प्रथमच महिला डॉक्टराच्या पुढाकाराने आरोग्य तपासणी व उपचार शिबीराचे सोमवारी आयोजन केले गेले असुन या शिबीरात जवळपास तीस आजाराचे निदान व त्यावर होमिओपॅथी उपचार केले आहेत . वै .आबादेव महाराज यांनी प्रारंभ केलेला ४६ वा शिवरात्र उत्सव महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली शनीवारी सुरू झाला आहे ,या शिबीराच्या माध्यमातून आपलेही समाजाप्रती काही उत्तरदायीत्व आहे ही जाणीव ठेऊन सिध्देश्वर संस्थान व डॉक्टर असो .च्या संयुक्त विद्यमाने महिला डॉक्टरानी पुढाकार घेत गोशाळा व नर्मदेश्वर मंदिर निर्माण



या हेतूने हे आयोजन केले होते ,या शिबीरात जवळपास १७५ व्याधीग्रस्तांनी तपासणी व उपचार घेतले . सोमवारी या शिबीराचे सकाळी दहा वाजता महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे हस्ते उदघाटन झाल्यानंतर सायंकाळी चार पर्यंत तपासणी व होमिओपॅथी उपचार केले गेले . यासाठी होमिओपॅथी च्या तज्ञ डॉक्टर शोभा सानप , डॉ.अर्चना देशपांडे व डॉ.प्रिती बडे या तीन डॉक्टर आपले योगदान देणार आहेत ,विशेषत्वाने महिला संबधी काही आजारावर त्या प्रामुख्याने तपासणी व उपचार करण्यात आले .

# लक्कीने आजोबालाच केले अनलक्की !


## न्यायालयातील जागेचा वाद खुना नंतर पुन्हा पेटला

### केज मधील खून प्रकरणी चौघा विरुद्ध खून व खुनाचा कट केल्याचा गुन्हा

### मुख्य आरोपी पोलिसांच्या ताब्यात :आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज/गौतम बचुटे**

देवदर्शनासाठी आलेल्या चुलत आजोबावर गणेश मंदिराच्या परिसरात कोयत्याने तेरा वार करून जागीच खून केल्या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. या खून प्रकरणी मुख्य आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. दि. ५ मार्च मंगळवार रोजी केज येथील कानडी रोडवर असलेल्या सिद्धी विनायक गणेश मंदिरात केज येथील गिरधारीलाल किसनलाल शिल्लक वय (५८ वर्ष) हे मंदिरात देवदर्शनासाठी गेले होते. ते सकाळी ७:३० वा. देवदर्शन करून मंदिराच्या बाहेर येत असताना मंदिराच्या बाजूला दबा धरून बसलेला त्यांच्या पुतण्याचा २५ वर्ष वयाचा मुलगा नात्याने त्यांचा चुलत नातू रोहित रतन शिल्लक (रा. केज) याने मंदिराच्या जवळ असलेल्या आडबाजूला रिकाम्या जागेत ओढत नेऊन धारदार शस्त्राने डोक्यात व मानेवर सपासप वार करून जागीच खून केला होता. सदरील खून हा जागेच्या वादातून झालेला आहे. मयत गिरधारीलाल शिल्लक यांचा मुलगा सागर शिल्लक यांच्या तक्रारी रोहीत ऊर्फ लक्की रतन शिल्लक याने धारदार कोयत्याने वार करून खून केला तर रामनिवास रामकरण शिल्लक, रतन रामनिवास शिल्लक दिपक रामनिवास शिल्लक या तिघांनी त्याला चिथावणी दिली म्हणून कर्क पोलीस ठाण्यात चौघा विरुद्ध गु र नं १०७/२०२४ भा दं वि ३०२, १३०-ब, १०७ आणि ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला हया खळबळ




जनक खून प्रकरणी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग हे पुढील तपास करीत आहेत.

काय होते जागेचे प्रकरण ? मयत गिरधारीलाल शिल्लक यांचे वडील रामकरण शिल्लक यांचे नावे केज शहरात मेन रोड येथे मालमता क्र. १९३० होती. रामकरण शिल्लक हे मयत झाल्या नंतर सदरची मालमता ही गिरीधारीलाल आणि त्यांचा भाऊ रामनिवास शिल्लक यांचे नावावर समान हिश्याने नीद झाली. त्या प्रमाणे त्याचा उपभोग गिरीधारीलाल आणि रामनिवास हे दोघे घेत होते. त्या नंतर सन २०१६ मध्ये गिरीधारीलाल यांनी कर्ज काढते वेळी पी आर कार्डची आवश्यकता आसल्याने पी आर कार्ड काढण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय, केज येथे जाऊन पीआर कार्ड काढले असता गिरीधारीलाल यांच्या लक्षात आले की, रामनिवास यांने वारसा आधारे त्या मानमतेवर त्यांचे स्वतःचे नाव लावले. त्यामुळे गिरीधारीलाल यांनी जिल्हा भुमी अभिलेख कार्यालय, बीड येथे दाद मागितली. त्या वरून रामनिवास यांचे नाव कमी झाले होते. सदर मिळकती बाबत गिरीधारीलाल यांनी मा. केज न्यायालयात दिवाणी दावा नं. ४८४/२०१८ दाखल करुन त्यामध्ये मनाई हुकूमनाम्या आधारे हक्कात मंजूर झाला होता. रामनिवास यांनी त्याच दाव्यात प्रति दावा दाखल करून त्यांनी मनाई दावा मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. परंतु त्यांचा अर्ज न्यायालयाने नामंजूर झाला होता. म्हणून त्यांचा पुतण्या रतन व दिपक, भाऊ रामनिवास, चुलत नातू रोहित उर्फ लक्की शिल्लक यांचा त्यांच्यावर राग होता. ते सर्वजण नेहमी अधुन मधुन शिवीगाळ करायचे आणि पोलीस ठाणेला तक्रार दिल्यास तुम्हाला व मुलाला खल्लास करून टाकू अशी धमकी देत होती. गिरीधारीलाल यांच्या हिश्याच्या अर्ध्या जागेची डागडुजी व दुरुस्ती करण्या करीता परवानगी मागील घेतली होती. त्यावेळी देखील त्यांना पोलीस बंदोबस्त मिळू नये म्हणून त्यांनी अडथळा आणला होता. परंतु हे काम कायदेशीर असल्याने पोलीस बंदोबस्त मिळाला होता.

तेव्हा पासून रतन, दीपक व रोहीत उर्फ लक्की हे त्यांना सतत शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देत होते. तसेच मागील महीन्यात गिरीधारीलाल व त्यांचा मुलगा सागर हे त्यांच्या दुकानात असतांना रतन व दिपक व रोहीत ऊर्फ लक्की यांनी कोर्टातील दावा काढून घे म्हणून धक्काबुक्की केली होती. दावा काढून घेतला नाही; तर त्यांचा करू मर्डर अशी धमकी दिली होती. परंतू गिरीधारीलाल यांनी दि. २२/२/२०२२ रोजी केज कोर्टात हजर होऊन दावा काढुन न घेता तारीख वाढवुन घेतली होती. त्या दिवशी पण तिघांनी घरी जाऊन रात्री येऊन तु दावा का मागे घेतला नाही तर खल्लास करू अशी धमकी दिली होती.

**आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी**

खून प्रकरणी पोलिसांच्या ताब्यात असलेला मुख्य आरोपी रोहित उर्फ लक्की शिल्लक याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दि. ११ मार्च पर्यंत पाच दिवसांचा पोलीस कोठडी सुनावली आहे.

## घुडेवाडीच्या उपसरपंचपदी राष्ट्रीय काँग्रेसच्या पूजा पाटील यांची बिनविरोध निवड




वादळवार्ता/कुडूत्री

घुडेवाडी (ता राधानगरी) येथील ग्रा. पं.च्या उपसरपंच पदी राष्ट्रीय काँग्रेसच्या सौ पूजा सागर पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी सरपंच सौ मनीषा संभाजी किरुळकर होत्या. आघाडीचे नेते भोगावतीचे माजी संचालक राऊमामा बुगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री राजर्षी शाहू दुध संस्थेचे संस्थापक बंडोपंत बुगडे, शिक्षक नेते बंडोपंत किरुळकर जनता दलाचे सर्जेराव बुगडे, पो.पा. सुशांत बुगडे यांच्या नेतृत्वाखाली आघाडीमध्ये ठरल्याप्रमाणे उपसरपंच सौ.सुलोचना बुगडे यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने या रिक्त जागेवर सौ पूजा सागर पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रा.पं सदस्य विठ्ठल बुगडे यांनी उपसरपंच पदासाठी सौ. पूजा सागर पाटील यांचे नाव सुचविले युवा नेते संभाजी किरुळकर यांनी स्वागत केले. ग्रामसेवक साताप्पा पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सदस्य सुहास बुगडे ,शिवाजी कुंभार, माया बुगडे, विठ्ठल बुगडे, सुलोचना बुगडे यांच्यासह नूतन उपसरपंच सौ पूजा पाटील सरपंच सौ मनीषा किरुळकर यांचा सत्कार करण्यात आला.

धनाजी बुगडे,मारुती पाटील ,मारुती बुगडे, साताप्पा कुंभार ,केरबा सुतार ,शंकर कुंभार ,तानाजी जाधव, अशोक कुंभार, रघुनाथ बुगडे ,बंडोपंत जठार, धनाजी बुगडे ,रंगराव पाटील, सागर पाटील, ज्ञानदेव लोहार ,दगडू कुंभार, केरबा सरावणे, दिनकर सावंत कर्मचारी महिला उपस्थित होत्या विठ्ठल सरावणे यांनी आभार मानले

## आनंदगाव येथील मराठ्यांचा निर्णय; मनोज जरांगे पाटील हाच आमचा पक्ष

### मनोज जरांगे पाटील यांचा गावकऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद

वादळवार्ता/केज

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी आनंदगाव येथे जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी निवडणुकीपर्यंत पूढाऱ्यांना गाव बंदीचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. गावकऱ्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याचा निश्चय करून तशी शपथही घेतली. मराठा आरक्षण मिळेपर्यंत आम्ही कोणत्याही पक्षाचे नाहीत असा निर्णय घेण्यात आला. यावेळी एक मराठा लाख मराठा घोषणा देण्यात आल्या. कॉन्फरसिंगद्वारे पाटील म्हणाले हा लढा चालू ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. आरक्षणासाठी ठाम भूमिका घेऊन आपण सर्वजण लढत आहोत लवकरच मी आनंदगाव येथे भेट देणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. जनजागृती फेरीला ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील महानिर्मिती महावितरण आणि महापारेषण या वीज कंपन्यातील कंत्राटी कामगारांचा विविध मागण्यांसाठी बेमुदत संप.

## ९५ % पेक्षा जास्त कंत्राटी कामगार सहभागी,

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

राज्यातील तिन्ही वीज कंपन्यातील कंत्राटी कामगारांच्या कंत्राटदाराकडून होणारी आर्थिक पिळवणूक दूर करण्यासाठी कंत्राटदार विरहित रोजगार द्यावा या प्रमुख मागणीसह कामगारांच्या वेतनात वाढ रोजंदारी कामगार पद्धती द्वारे शाश्वत रोजगार या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती तर्फे राज्यातील सुमारे ४२ हजार वीज कंत्राटी कामगारांतर्फे दिनांक ५ मार्च २०२४ पासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे.

पुण्यातील रास्ता पेठ येथील विद्युत पारेषण वितरण कंपनी समोर आंदोलन करून बेमुदत संप पुकारण्यात आला. या वेळी मा ऊर्जा मंत्री यांनी दखल घेवून कंत्राटी



कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी कृती समिती पदाधिकारी नीलेश खरात यांनी रास्ता पेठ कार्यालय समोर आंदोलनात व्यक्त केली आहे. राज्याचे ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वीज कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाकडे लक्ष द्यावे त्यांच्या विविध मागण्यांची दखल घेऊन त्या मान्य कराव्यात अशी अपेक्षा या वीज कंत्राटी कामगारांनी व्यक्त केली. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये सुमारे ४२ हजार कंत्राटी कामगार या आंदोलनात सामील झाले आहेत. प्रशासन जर या मागण्यांकडे कानाडोळा करत असेल तर हे कंत्राटी कामगारांतर्फे बेमुदत आंदोलन असेच पुढे सुरू राहणार आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी कंत्राटी कामगारांच्या मागण्या संदर्भात लवकर विचार करून कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार कृती समिती संघटक सचिन मेंगाळे व निलेश खरात व्यक्त केली आहे. पुणे रास्ता पेठ कार्यालय समोर निलेश खरात, सचिन मेंगाळे, ऊमेश आणेराव, सागर पवार सुमीत कांबळे, निखिल टेकवडे, मार्गदीप मस्के, ईतर पदाधिकारी यांनी मार्गदर्शन केले आहे.यावेळी सर्वच विभागातील कंत्राटी कर्मचारी उपस्थित होते.या बेमुदत संपात महाराष्ट्र राज्यातील विद्युत क्षेत्रातील, मुख्य कार्यालय मुंबई, तसेच ठाणे, भांडुप, पनवेल, रायगड, महाड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा मधील कंत्राटी कामगार एकजुटीने सहभागी झाले आहेत. अशी माहिती सचिन मेंगाळे यांनी दिली आहे

## विभागीय सूर्यनमस्कार स्पर्धेत श्री गजानन विद्यामंदिर शाळेने मारली

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर / प्रा संजय तुपे**

छत्रपती संभाजीनगर गरवारे कम्युनिटी सेंटर वाळूज छत्रपती संभाजीनगर जिल्हा योग संघटना आणि भारतीय योग संस्थान, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने रथसप्तमी आयोजित सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेमध्ये श्री गजानन प्राथमिक व माध्यमिक विद्या मंदिर व बसवंतराव पाटील इंग्लिश स्कूल, रांजणगाव शे.पु. च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.



श्री गजानन प्राथमिक विद्या मंदिर १ ली ते ४ थी मुलांचा गट बजाजनगर वाळूज विभागातून प्रथम क्रमांक श्री गजानन प्राथमिक विद्या मंदिर १ ली ते ४ थी मुलींचा गट बजाजनगर वाळूज विभागातून प्रथम क्रमांक श्री गजानन माध्यमिक विद्या मंदिर ५ वी ते ९ वी मुलांचा गट बजाजनगर वाळूज विभागातून द्वितीय क्रमांक श्री गजानन माध्यमिक विद्या मंदिर ५ वी ते ९ मुलींचा गट बजाजनगर वाळूज विभागातून द्वितीय क्रमांक बसवंतराव पाटील प्राथमिक इंग्लिश स्कूल १ ली ते ४ थी मुलांचा गट बजाजनगर वाळूज विभागातून द्वितीय क्रमांक बसवंतराव पाटील माध्यमिक इंग्लिश स्कूल ५ वी ते ९ वी मुलांचा गट बजाजनगर वाळूज विभागातून चतुर्थ क्रमांक बसवंतराव पाटील माध्यमिक इंग्लिश स्कूल ५ वी ते ९ वी मुलींचा गट बजाजनगर वाळूज विभागातून चतुर्थ क्रमांक या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक आय. जी. जाधव सर, संस्थेचे सचिव हरीश जाधव सर, प्राथमिक मुख्याध्यापिका सुरेखा बस्वदे, माध्यमिक मुख्याध्यापक मष्णाजी शिनगारे, प्राथमिक विभागप्रमुख शहाजी मांगनाळे, माध्यमिक विभागप्रमुख प्रा.संजय तुपे, बसवंतराव पाटील प्राथमिक मुख्याध्यापिका रेखा बिदरकर, माध्यमिक मुख्याध्यापक अप्पासाहेब शिरसाठ, कल्याण कुलकर्णी, सौरभ लगड, पुजा गिरी, पवार मॅडम, हिंगणकर सर, दीपक पठारे, दीपक कोळी,शिंदे सर, क्रीडा शिक्षक जब्बार पठाण तसेच गुलाब मोहिते आदी शिक्षक उपस्थित होते.

## सोशल मीडिया जगातील सर्वात जलद संवादाचे साधन- तलाठी सौ. खांदे

**वादळवार्ता/बीड**

आजच्या युगात सोशल मीडिया जगातील सर्वात जलद संवादाचे साधन बनले आहे.सोशल मीडियाची लोकप्रियता लोकांमध्ये दिवसेंदिवस वाढत आहे,आणि याचा उपयोग प्रत्येक वयोगटातील लोक करीत आहेत.परंतु ज्या पद्धतीने नाण्याच्या दोन बाजू असतात त्याच पद्धतीने सोशल मीडियाचे एकीकडे सकारात्मक फायदे आहेत परंतु दुसरीकडे याचे दुष्परिणाम देखील होत असल्याचे मत तलाठी.सौ खांदे मॅडम यांनी व्यक्त केले. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिजम आणि कॉम्प्युटर सायन्स महाविद्यालय बीड तसेच संभाजी राजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे कोळवाडी येथे आयोजित शिबिराच्या प्रबोधनपर व्याख्यान कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कै. आण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थेचे सचिव तसेच संभाजीराजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड.प्र. प्राचार्य गणेश पोकळे हे होते. व्यासपीठावर वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम आणि कम्प्युटर सायन्स बीड प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.




पुढे बोलताना तलाठी सौ. खांदे मॅडम म्हणाल्या की, कॅशलेस व्यवहारासाठी मोबाईल वापरणे गरजेचे ठरले. इंटरनेट आणि मोबाईलचा वाढता उपयोग बघता प्रत्येकाकडे मोबाईल आहे .कधी कामाची वस्तू म्हणून तर कधी करमणुकीचे साधन म्हणून इंटरनेटचे आकर्षण वाढू लागले. शिक्षणासाठी सोशल मीडियाचा चांगला उपयोग झाला. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात माहितीचे आदान प्रदान करण्याचे सोशल मीडिया हे उत्तम साधन ठरले. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक अशी माहिती चांगल्या प्रकारे मिळू लागली .शाळा, महाविद्यालयांना विद्यार्थ्यांशी महत्त्वाचे मेसेजेस पाठवणे सोपे झाले. सोशल मीडियामुळे दुरचे लोक जवळ आले. परंतु समोरा-समोरील संवाद कमी झाला असल्याचेही त्यांनी म्हटले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.सुहास गाढवे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. भूषण मठपती यांनी केले तसेच शेवटी आभार प्रा.ओंकार देशमुख यांनी मानले या कार्यक्रमाला इम्रान पठाण, दीपक जाधव, प्रवीण उंदरे,सचिन चौरे,सौ. संध्या खोसे,विद्यार्थी, स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
संपादक ; अजय भांगे मो. ९४२२६६००७७



## बीड लोकसभा जन संपर्क अभियान अहवाल पक्ष श्रेष्ठींना सादर -प्रा.ईश्वर मुंडे



बीड लोकसभेची निवडणूक इंडीया आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष लढवणार असून ईच्छूक उमेदवारांना लोकसभा मतदार संघात जन संपर्क करण्यास सांगण्यात आलेले होते.संभाव्य उमेदवारांमधील जन संपर्कात आघाडी घेतलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी खा.शरद पवार यांची मुंबई येथील सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेऊन आपला जन संपर्क अहवाल सादर केला.याच वेळी प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांना ही आपला जन संपर्क अहवाल सादर केला.

सदरील अहवालाचे वाचन करून खा.शरद पवार व आ.जयंत पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगून शेवटी खा.शरद पवार यांचा अंतीम निर्णय आपणास मान्य असून पक्ष जो उमेदवार देईल त्याचे काम संपूर्ण ताकतीने करून बीड लोकसभा निवडणूक जिंकू असा आत्म विश्वास प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

# ग्रामसेवकाला व प्रशासनाला कंटाळून गोदरी गावच्या सरपंचांचे पंचायत समिती समोर उपोषण

## गेल्या नऊ वर्षांपासून गोदरी ग्रामपंचायतला गोचीडासारखे चिटकलेल्या ग्रामसेवकाची तात्काळ बदली करा सरपंच

**दैनिक वादळ वार्ता**
**जळगाव/संजय जटाळे**

जामनेर तालुक्यातील गोदरी येथे सरपंच पदावर असलेल्या मंगलाबाई भगवान पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील नागरिकांनी कुठल्याही विकास कामांच्या संदर्भात ग्रामसेवकाला विचारपूस केली असता ग्रामसेवक फक्त उडवाउडवीची उत्तरे देऊन विकास कामांकडे कानाडोळा करीत असतात यांच्यावर वरिष्ठांचा दबाव असतो याचे कारण असे आहे की, गोदरी ग्रामपंचायतची निवडणूक होऊन ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांचा पराभव करून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या उमेदवारांनी बाजी मारलेली आहे परंतु तालुक्यावर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची सत्ता असल्यामुळे गोदरी ग्रामपंचायतकडे हेतू पुरस्कार दबाव टाकून विकास कामांना थांबवलं जात आहे असेही गोदरी ग्रामपंचायतच्या सदस्य तसेच इतर वक्त्यांनी बोलताना सांगितले आहे त्याचप्रमाणे गावातील घरकुल योजना सार्वजनिक स्वच्छालय १५ वित्त आयोग पंचायत समिती मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना शबरी योजनेचे प्रस्ताव रमाई आवास योजना मोदी आवास योजना या सर्व योजनांचे प्रस्ताव ग्रामपंचायतीच्या मार्फत पूर्ण करून दिले असताना सुद्धा लाभार्थ्यांना अजूनही पहिल्या हप्त्याची रक्कम मिळत नाही तसेच गावातही काहीही विकासकाम करण्याच्या उद्देशाने ग्रामसेवकाला सांगितले असता ग्रामसेवक सुद्धा लक्ष देत नाही गेल्या नऊ वर्षांपासून एकच ग्रामसेवक गोदरी ग्रामपंचायतला चिटकलेला आहे गावात विकास कामांचे मात्र झिरो प्रमाणात असून त्याच्यावर पंचायत समिती जामनेर यांचे अतिशय दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले जात आहे त्यामुळे आम्ही ग्रामपंचायतच्या सदस्यांसह सरपंच तसेच गावातील ग्रामस्थ यांच्यावतीने अनेक वेळा पंचायत समितीला अर्ज निवेदन देऊन आमच्या कामांना कुठलीही गती मिळालेली दिसत नसल्यामुळे आम्ही उपोषणाचा



मार्ग निवडलेला आहे कारण जामनेर तालुक्यामध्ये ग्राम विकास मंत्री गिरीश भाऊ महाजन यांची सत्ता आहे आणि गोदरी ग्रामपंचायतीवर आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने विजय मिळवलेला आहे त्यामुळेच आमच्या ग्रामपंचायतकडे हेतू पुरस्कर दुर्लक्ष केले जात आहे आणि आमच्या कामांवर दबाव आणला जात आहे असे सुद्धा गोदरी ग्रामपंचायतचे सरपंच सदस्य व ग्रामस्थांनी बोलताना सांगितले असून जोपर्यंत गोदरी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांची बदली करून आम्हाला दुसऱ्या ग्रामसेवक मिळत नाही तसेच आमच्या मागण्या सुद्धा पूर्ण होत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण मागे घेणार नाही असे सुद्धा आवाहन गोदरी ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आलेले आहे तसेच या उपोषणाला जामनेर तालुक्यातून राष्ट्रवादी कॉंग्रेस व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शवल्याचे दिसून आले आहे.

# वाळूने भरलेले दोन हायवा पकडले

## देवदर्शन करून बाहेर पडत असलेल्या आजोबाचा गणेश मंदिरा जवळच केला खून !

**वादळवार्ता/बीड**

चकलांबा पोलीस रात्री पेट्रोलिंग करत असताना वाळूची विनापरवाना बेकायदेशीर चोरटी करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या असून या कारवाईत तब्बल साठ लाख रुपयांचा मुद्द्यामाल जप्त करण्यात आला आहे. अधिक माहिती अशी कि, चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे व पथक पेट्रोलिंग करत असताना त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, राक्षस भवन भागातून वाळूची विनापरवाना बेकायदेशीर चोरटी



वाहतूक होत आहे. त्यानुसार त्यांनी सापळा रचला असता रात्री २१.३० वाजता ड्रायव्हरसह वाळूने भरलेला एक हायवा व सकाळी ०७.०० वाजता ड्रायव्हरसह वाळूने भरलेला एक हायवा असे एकूण दोन हायवा (किंमत अंदाजे ६० लाख रुपये) सापळा रचून पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला असून आरोपी नामे शेख नबी शेख अब्बास, वय ४० राहणार चकलांबा, अहमद शेख राणा उमापूर, नफिर वजीर वय २८ महार टाकळी, संतोष नाटकर राहणार राक्षसभुवन तालुका गेवराई यांच्यावर गुन्हा दाखल असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुमावत करत आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपवगीय पोलीस अधिकारी नीरज यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे, प्र पोलीस उपनिरीक्षक कुमावत, श्री. गुजर, श्री.

# छ. शिव जयंती निमित्त किल्ले बनवणे स्पर्धाचे आयोजन.



**वादळवार्ता/बीड**

युसूफ वडगाव येथील यु वडगांव माध्यमिक विद्यालया मधे छ. शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुमारावस्थेतील मुलांना चित्रकला व मृदुकला या विषयामध्ये गोडी निर्माण व्हावी व बहुजन राजे छ. शिवाजीमहाराज यांच्या गड किल्ले याविषयी ज्ञान व माहिती प्राप्त व्हावी त्यानिमित्ताने किल्ले बनवण्याची स्पर्धा आयोजित केली गेली होती. यात बऱ्याच विद्यार्थ्यांनी आपल्या कलेची चुणूक दाखवून माती पासून व विविध वस्तूंपासून मनमोहक किल्ले तयार केले होते. कुमारावस्थेतील मुलांना विविध कलेमध्ये गुंतवून ठेवण्यासाठी व त्यांच्यातील कलाविष्काराला चालना देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली गेली होती. यात प्रामुख्याने प्रथम क्रमांक गायकवाड सिद्धी, द्वितीय क्रमांक थळकरी शिवतेज व तृतीय क्रमांक थळकरी सिद्धी या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला. शरद पवार इन्स्पायर फेलोशिप धारक शिक्षक कांबळे आर. एन यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले, तर चित्रकला शिक्षक श्री पुरी सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व गुणानुक्रमे प्रथम आलेल्या स्पर्धकांचे मुख्याध्यापक भोसले सर यांनी स्वागत केले, तर कार्यक्रमासाठी मस्के सर, चौधरी सर, मुकदम सर, खरबड सर यांची उपस्थिती होती.

# वाघदेवी माता मंदिर धानोरा येथे एक लक्ष आठ हजार दिपोत्सव सोहळ्याचे आयोजन

वादळवार्ता/नांदेड

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील धानोरा येथील नवसाला पावणाऱ्या वाघ देवी माता मंदिरात दिनांक १४ मार्च २०२४ रोजी एक लक्ष आठ हजार तुपाचा दीपोत्सव कार्यक्रम संपन्न होणार आहे या कार्यक्रमाला श्री ष ब्र १०८ श्री सिद्ध दया शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर श्री सद्गुरु शिवलिंग स्वामी महाराज पिंपळगाव श्री १०८ राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांची प्रमुख उपस्थिती तर उद्घाटक राजेश पवार नायगाव विधानसभा आमदार प्रमुख पाहुणे प्रमुख पाहुणे खासदार प्रताप पाटील चिखलीकर आशाताई श्यामसुंदर शिंदे सामाजिक कार्यकर्त्या विक्रांत शामसुंदर शिंदे बाळकृष्ण हळद पुढे पाटील डी वाय एस पी बिलोली देविदास पाटील बोमनाळे माजी नगरसेवक नायगाव बाजार करुणा धनंजय मुंडे स्वराज्य शक्ती संस्थापक अध्यक्ष माननीय रवींद्र पाटील चव्हाण सचिव एज्युकेशन सोसायटी नायगाव संजय आप्पा बेळगे माजी शिक्षण सभापती श्री मधु गिरगावकर सेवानिवृत्त अधिकारी श्री श्रीधर जगताप पोलीस सहायक निरीक्षक रामतीर्थ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी या कार्यक्रमाला साधुसंत मंत



कीर्तनकार प्रवचन टाळकरी माळकरी यासह यांच्यासह जिल्ह्यातील हजारो भाविक भक्त उपस्थित राहणार आहेत दिनांक 14 मार्च 2024 रोजी सायंकाळी पाच ते सात नवेगाव धानोरा ते जुने गाव वाघदेवी मंदिर गुरुवर्याची भव्य मिरवणूक व दीपोत्सव व रात्री आठ वाजता गुरुवर्यांची अशी वचन होणार आहे तरी जिल्ह्यात परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील हांडे व समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले.

# प्रा. अंजली जाधव राष्ट्रीय नारी सन्मान पुरस्काराने सन्मानित

**दैनिक वादळ वार्ता**

प्रा. अंजली जाधव यांना "राष्ट्रीय नारी सन्मान" २०२४ पुरस्कार नुकताच मिळाला. हा पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. जागतिक मराठी दिनानिमित्त वेद फाउंडेशन कोल्हापूर, समृद्धी प्रकाशन सिंधुदुर्ग, अनुश्री महिला संस्था नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय दीपस्तंभ कला साहित्य संमेलन ठाणे या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील केलेल्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय दीपस्तंभ कला साहित्य संमेलनात देण्यात येणारा यावर्षीचा"राष्ट्रीय नारी सन्मान" २०२४ पुरस्कार प्रा. अंजली जाधव यांना नुकताच देण्यात आला आहे. वेद फाउंडेशन कोल्हापूर, समृद्धी प्रकाशन सिंधुदुर्ग, अनुश्री महिला संस्था नवी मुंबई यांच्या निवड समितीने प्रा. अंजली जाधव यांची या पुरस्कारासाठी निवड केली होती. प्रा. अंजली जाधव यांचे शिक्षण B.A.B.ed, M.A.M.ed, SET in Hindi, इतके झाले असून सध्या त्या सोलापूर विदयापीठामध्ये Ph.D. करत आहेत. त्यांचा Ph.D. चा विषय तृतीय पंथी लोकांच्या जीवनाशी संबंधित असल्याने त्यांनी संशोधनासाठी बऱ्याच तृतीयपंथी लोकांच्या भेटी घेतल्या त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना मायेची उभारी दिली. समाजाने तृतीयपंथी लोकांना घृणास्पद वागणूक देवू नये म्हणून त्या प्रयत्न करत आहेत. साहित्य लेखनातून तृतीयपंथी लोकांचे दुःख, वेदना मांडून त्यांच्याविषयी सकारात्मक दृष्टिकोण निर्माण करण्याचा त्या प्रयत्न करत आहेत. त्यांची काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या कविता वास्तविक असून काळजामध्ये घर करणाऱ्या आणि माणसाला विचार करायला लावणाऱ्या आहेत.

मुक्ति (स्त्री मुक्ति आधुनिक संदर्भ) या काव्यसंग्राहासाठी त्यांची वेश्या" हया कवितेची निवड झाली आहे. तर बेनाम चिट्ठीयाँ काव्यसंग्राहासाठी बेटियों की सिसकीयाँ या कवितेची निवड झाली आहे. त्या सृष्टी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संचालिका असून त्या समाजसेवेचे कार्य करतात. त्या रोज 6pm से 7pm. एक तास गरीब विद्यार्थ्यांना मोफत ज्ञानदान करतात. त्या अभ्यासाबरोबर रांगोळी चित्रकला, शुद्धलेखन, नृत्य याचे ज्ञान देतात. त्यांना अष्टपैलू व्यक्तिमत्व पुरस्कार, Indien Talent Award, The super Women Award, Mother Teresa memorial Award, संत कबीर सेवा रत्न अवार्ड, आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श साहित्यिक पुरस्कार, राष्ट्रीय गुरुवंदना पुरस्कार असे काही पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. तसेच त्यांनी बालगुन्हेगारांवरती संशोधन केले आहे. त्यांच्या संपर्कात असणाऱ्या पालकांचे व विदयार्थ्यांचे त्या समुपदेशन करतात. त्यांचा' पाककला' हा कोर्सही झाल्याने त्या महिलांना घरगुती लघुउद्योगाचे ज्ञान देतात.



जागतिक मराठी दिनानिमित्त वेद फाउंडेशन कोल्हापूर, समृद्धी प्रकाशन सिंधुदुर्ग, अनुश्री महिला संस्था नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय दीपस्तंभ कला साहित्य संमेलन रविवार, दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता मराठी ग्रंथसंग्रहालय, गोखले रोड, नौपाडा, ठाणे स्टेशननजीक, ठाणे (प.)-४००६०२ या ठिकाणी पार पडले.प्रा. अंजली जाधव यांना जयराज नायर ज्येष्ठ अभिनेते, मा. डॉ. लक्ष्मण शिवणेकर ज्येष्ठ साहित्यिक कवी, गझलकार शिक्षणतज्ज्ञ, मा. नूतन जयंत, मराठी अभिनेत्री, मा. सौ. नेहा निनाद धुरी, चित्रपट निर्माती, उद्योजक, समाजसेविका, मा. सौ. राजश्री बोहरा, अध्यक्ष, अ. भा. म. सा. परिषद, ठाणे, या व इतर दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत "राष्ट्रीय नारी सन्मान" हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )